# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २०५ वा मंगळवार दि.१६ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB, Racold, legrand, HAVELLS, L&T SWITCHGEAR, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


# देशहितासाठी महायुती गावपातळीवर मजबुत करावी ना. संजय बनसोडे यांचे अवाहन; जिल्हास्तरीय महायुतीच्या मेळाव्यास मोठा प्रतिसाद









लातूर :- सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास आणि सबका विश्वास या सुत्रानूसार पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब सर्व जाती धर्मांना सोबत घेवून काम करत आहेत. देशाचे हित नरेंद्रजी मोदी यांच्याच नेतृत्वात असून केंद्राप्रमाणे महाराष्ट्रही विकास कामात पुढे घेवून जाण्यासाठी महायुती निर्माण झाली असून महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी जिल्ह्यासह तालुका आणि गावपातळीवर बुथ स्तरावर महायुती मजबुत करावी असे अवाहन राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी जिल्हास्तरीय महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना केले. लातूर जिल्ह्यातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आर. पी.आय. (आठवले गट) यांच्यासह सहयोगी सर्व मित्र पक्षाच्या कार्यकर्त्यांचा जिल्हास्तरीय महायुतीचा मेळावा क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थित लातूर येथिल गिरवलकर मंगल कार्यालयात रविवारी दुपारी झाला. या मेळाव्यास भाजपा समन्वय प्रमुख आ. रमेशअप्पा कराड, राष्ट्रवादी काँग्रेस समन्वय प्रमुख आ. बाबासाहेब पाटील, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बालाजी काकडे, खा. सुधाकर शृंगारे, आ. अभिमन्यू पवार, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शिवसेना जिल्हा प्रमुख ॲड. बळवंत जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख, आर.पी.आय. आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, माजी आमदार सुधाकर भालेराव, बब्रुवान खंदाडे, गोविंदआण्णा केंद्रे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, प्रदेश भाजपाचे सचिव अरविंद पाटील निलंगेकर, प्रा. प्रेरणा होनराव, लोकसभा निवडणूक प्रमुख राहुल केंद्रे, भाजपाचे शैलेश लाहोटी, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, गुरुनाथ मगे, सौ. उत्तरा कलबुर्गे, सौ. रागिणी यादव, सौ. जयश्री पाटील, सौ. मिनाक्षी पाटील, सौ. मिनाताई भोसले, ॲड. संभाजीराव पाटील, संजय दोरवे, बापुराव राठोड, तुकाराम गोरे, अमोल निडवदे, विक्रम शिंदे, अमोल पाटील, दिग्विजय काथवटे, शिरीष कुलकर्णी, गणेश गोमसाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. व्यंकट बेद्रे, मकरंद सावे, पंडितराव धुमाळ, बबन भोसले, मुर्तुजा खान, प्रशांत पाटील, भरत चामले, सौ. मिनाक्षी शिंगडे, जावेद शेख, शिवसेनेचे गोपाळ माने, सतिष देशमुख, गणेश पांचाळ, सुधीर पाटील, विकास जाधव, सौ. मोहिनी सुर्यवंशी यांच्यासह भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आर.पी.आय. यासह महायुतीतील सर्वच पक्षाचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यात महायुतीतील कार्यकर्त्यांत प्रचंड उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण होते. फिर एक बार मोदी सरकार, महायुतीचा विजय असो, प्रभुरामचंद्र की जय अशा गगनभेदी घोषणा देवून कार्यकर्त्यांनी सभागृह दणानूण सोडले होते. देशभर सर्वांगीन विकासाचा डोंगर उभा करणार्या नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात देश महासत्तेकडे जात आहे. त्यांच्या कामावर विश्वास ठेवून अजितदादा पवार साहेबांनी गुजरात प्रमाणे महाराष्ट्र राज्यही विकास कामात पुढे घेवून जाण्यासाठी महायुतीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगून ना. संजय बनसोडे म्हणाले की, मागील सरकारच्या काळात मी राज्यमंत्री म्हणून काम केले. कोरोनाचा काळ असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घराबाहेर आले नाहीत मात्र उपमुख्यमंत्री अजितदादांनी रात्रंदिवस काम करुन जनतेला मदत केली हा माझा अनुभव आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यातला कार्यकर्ता आजही जागा असल्याने त्यांच्या कामाचा मोठा धडाका सुरु आहे. मराठवाडा पाणीदार व्हावा, दुष्काळमुक्त व्हावा यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वॉटरग्रीड योजना मंजूर केली होती मात्र ही योजना ठाकरे सरकारने बंद पाडली मराठवाड्याच्या हितासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या तिघांनी मिळून पुन्हा या योजनेला मान्यता दिली असल्यासे सांगून ना. संजय बनसोडे म्हणाले की, केंद्रातील आणि राज्यातील महायुतीच्या शासनाने अनेक विकासाची कामे केली असून विविध कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. देश हितासाठी आणि देशाच्या सर्वांगीन विकासासाठी पुन्हा नरेंद्रजी मोदी पंतप्रधान होणे काळाची गरज असल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी येणार्या काळात होणार्या निवडणुकीसाठी एक दिलाने, एक ताकतीने महायुतीच्या उमेदवाराला प्रचंड मताधिक्याने निवडूण आणण्यासाठी मेहनत घ्यावी आणि गावपातळीवर, बुथ स्तरावर महायुती मजबुत करावी. त्याच बरोबर येत्या २२ जानेवारी रोजी जगाने दखल घ्यावी अशा भव्य मंदिरात रामलल्ला मुर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असल्याने प्रत्येकांनी त्या दिवशी दिवाळी साजरी करावी असे अवाहन केले. या मेळाव्यात बोलताना भाजपा समन्वय प्रमुख आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता केवळ नरेंद्र मोदी यांच्यात आहे. त्यांच्या नेतृत्वात देशाने सर्वांगीन विकासाची उंची गाठली असून सार्वजनिक विकास कामाबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात लाभार्थ्यांना मिळाला. राज्यात मागील काळात धोका देवून अभद्र आघाडी झाली होती. मर्द मावळा एकनाथ शिंदे यांनी अभद्र आघाडीतून बाहेर पडून जनतेच्या हितासाठी युतीत सहभागी झाले. भाजपा खुर्चीपेक्षा तत्वाला महत्व देते. एकनाथ शिंदे यांच्या कामाचा आवाका, अजितदादांचे धाडसी निर्णय आणि देवेंद्रभाऊंच्या चाणक्य नितीने महाराष्ट्रात महायुती सरकारच्या माध्यमातून विकासाला मोठी गती मिळाली आहे. महायुतीत भाजपा मोठ्या भावाच्या भुमिकेत आहे. महायुतीतील नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची मजबुत फळी असून सर्वांनी गावपातळीवर एकत्रितपणे काम करुन लोकसभेचा महायुतीचा उमेदवार राज्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी व्हावे यासाठी प्रयत्न करावेत असे अवाहन केले. लोकसभेची निवडणुक देशाला दिशा देणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना आरक्षण दिले, शेतीला प्राधान्य दिले, सुरक्षिततेसाठी कठोर पावले उचलले, तरुणांना उद्योग व्यवसायासाठी प्रोत्साहित केले. मोदीजींच्या योग दिनाचा जगाने आदर्श घेतला असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेसचे समन्वय प्रमुख आ. बाबासाहेब पाटील म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी स्वत: उमेदवार समजून प्रत्येकांनी काम करावे. हा देश काम करणार्या पाठिशी आहे केवळ बोलणार्याच्या पाठिशी नाही हे दाखवून द्यावे असे बोलून दाखविले. शिवसेना जिल्हा प्रमुख ॲड. बळवंत जाधव यावेळी बोलताना म्हणाले की, देशाचे भवितव्य सुरक्षित रहावे यासाठी देशाला नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्याच नेतृत्वाची गरज आहे. गेल्या सत्तर वर्षात काँग्रेसने मुस्लिमांना कधीच हिंदुस्थानी होवू दिले नाही. विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेतले नाही. मोदीजी यांनीच सर्व जाती धर्मांना विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेतले. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा शिवसेना एकत्र लढून जिंकले असताना रातोरात शिवसेना विकल्याचे पाप उद्धव ठाकरे यांनी केले. शिवसैनिकांच्या पाठीत खंजिर खुपसन्याचे कृत्य केले. आनाथांचा नाथ एकनाथ शिंदेच आहेत. त्यांच्याच नेतृत्वाती शिवसैनिक महायुतीच्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेतल्याशिवाय राहणार नाही. या मेळाव्यात आ. अभिमन्यू पवार, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख, आर. पी.आय. चे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन महायुतीच्या विजयासाठी एकत्रितपणे काम करावे असे अवाहन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भाजपा महिला आघाडीच्या सौ. रागिणी यादव यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गुरुनाथ मगे यांनी केले तर शेवटी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी आभार मानले. राष्ट्रगिताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून पर्यटन विकास अंतर्गत लातूर ग्रामीणमधील १७ कामासाठी २ कोटीचा निधी मंजूर

लातूर दि. १५- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १७ गावातील पर्यटन स्थळाच्या विकासासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून २ कोटी रुपयांचा निधी राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या माध्यमातून मंजूर झाला आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या पर्यटन स्थळाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी राज्याचे पर्यटन विकास मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब यांच्याकडे वेळोवेळी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पाठपुरावा केला होता. केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून लातूर ग्रामीण मतदार संघातील १७ गावातील पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता पर्यटन योजनेअंतर्गत तब्बल दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे

राज्याच्या पर्यटन विकास योजनेअंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सोनवती ता. लातूर येथे खंडोबा मंदिर परिसर अंतर्गत सुधारणा करणे १० लक्ष, भातखेडा ता. लातूर येथे महादेव मंदिर परीसरात सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे १५ लक्ष, माणुसमारवाडी ता. रेणापूर येथे बालाजी हनुमान देवस्थान सभामंडप बांधकाम व परिसर विकसीत करणे २० लक्ष, चिकलठाणा ता. लातूर येथे बारा इमाम दर्गा परिसरात सोलार विद्युतीकरण करणे १५ लक्ष, बोरी ता. लातूर ऋषिनाथ मंदिर परिसर विकसीत करणे १५ लक्ष, मौजे भातांगळी ता. लातूर येथे विठ्ठल रुक्मीणी मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष, चाटा ता. लातूर येथे चंपाबाई महाराज मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष, खंडाळा ता. लातूर येथे अंबाबाई मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष, चिंचोली ब. ता. लातूर येथे काळ भैरवनाथ मंदिराकडे जाणारा पोच रस्ता व परिसर विकसीत करणे १० लक्ष, सारसा ता. लातूर येथे गणेशनाथ मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष, निळकंठ ता. लातूर येथे निळकंठेश्वर मंदिर सभामंडपातील उर्वरीत बांधकाम व परिसर विकसीत करणे १० लक्ष, मुरुड ता. लातूर येथे दत्त मंदिर सभामंडप व परिसर विकसीत करणे १० लक्ष, मसला ता. लातूर येथे विठ्ठल रुक्मीणी मंदिर किचन शेड बांधणे व परिसर विकसीत करणे १० लक्ष, मांजरी ता. लातूर येथे जगदंबा देवीचे मंदिर विकसीत करणे १० लक्ष, भिसे वाघोली ता. लातूर येथे हनुमान मंदिर विकसीत करणे १५ लक्ष, दजीबोरगाव ता. रेणापूर येथे चिन्मयानंदस्वामी महाराज मठ परिसर विकसीत करणे १० लक्ष, कारसा ता. लातूर येथे विठ्ठल रुक्मीणी मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष याप्रमाणे निधी मंजूर झाला आहे सदरील निधी मंजूर झाल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.



राज्यात मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार साहेब यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात खेड्यापाड्यात शासनाच्या योजनेच्या माध्यमातून भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांना विविध विकासाची कामे मंजूर करण्यात आणि त्यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेण्यात मोठे यश आले आहे यामुळे गावा गावात विकासाची कामे मोठ्या प्रमाणात होत असून विकासाला मोठी गती मिळाली आहे. लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध गावच्या पर्यटन स्थळाचा विकास व्हावा यासाठी अनेक प्रस्ताव पर्यटन विभागाकडे दाखल असून मंजुरी स्तरावर आहेत त्याही उर्वरित कामांना लवकरच मंजुरी मिळणार आहे एकूणच भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणजे धडाडीचे आमदार कामगिरी दमदार असेच ग्रामीण भागातील जनतेतून बोलले जात आहे.

# 'लातूर ग्रामीण'मध्ये अडीच कोटीच्या कामांना हिरवा कंदील



लातूर : 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे २०२१ नंतर मंजुरी दिलेल्या विकासकामांवरील स्थगिती उठवण्यात आली आहे. त्यामुळे 'लातूर ग्रामीण'मध्ये अडीच कोटीच्या विकासकामांना आता हिरवा कंदील मिळाला आहे. या पाठपुराव्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार श्री. धिरज देशमुख यांचे आभार मानले.प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत मंजुरी दिलेल्या कामांवरील स्थगिती उठवण्याची मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री, राज्याचे ग्रामविकास व पर्यटन मंत्री श्री. गिरीश महाजन यांच्याकडे केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत त्यांनी विकासकामांवरील स्थगिती मागे घेतली. याबाबतचा अध्यादेशही प्रसिद्ध करण्यात आला आहे.यानुसार लातूर तालुक्यात काटगाव येथे दर्गा मस्जिद परिसरात सभामंडप, निवळी येथे निळकंठेश्वर मंदिर परिसरात सभागृह, चिंचोलीराववाडी येथे हनुमान मंदिर परिसरात सभागृह व प्रसाधन गृह, नागझरी येथे नागोबा मंदिर परिसरात भक्त निवासस्थान बांधकाम तर औसा तालुक्यातील बोरगाव न. येथे नकुलेश्वर मंदिर परिसरात सभागृह, टाका येथे भीमाशंकर मंदिरासमोर सभागृह, अंदोरा येथे आम्रशाली बाबा दर्गा येथे भक्त निवास, उटी बु. येथे जगदंबा देवी मंदिरासमोर छबिना मार्गाचा रस्ता, सिमेंट - पेव्हर ब्लॉक रस्ता होणार आहे. रेणापूर तालुक्यातील माणूसमारवाडी येथे बालाजी मंदिर परिसरात सभागृह, शेरा येथे दावल मलिक दर्गा परिसरात सभागृह, दर्जी बोरगाव येथे चिन्मयानंद स्वामी मंदिर परिसरात भक्त निवास व शौचालय बांधकाम आणि प्रभाग क्रमांक ९ मध्ये रेणुकादेवी मंदिराचे पश्चिम गेटचे बांधकाम व दर्शन रांगेसाठी दुसऱ्या मजल्यावर सभागृह बांधणे... अशी विकासकामे होणार आहेत. अनियमितता टाळून ही कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही पर्यटन विभागाने दिल्या आहेत.

## संपादकीय....


# काँग्रेस अजूनही संभ्रमात

राम मंदिर उद्घाटन सोहळ्यात उपस्थित राहण्यास काँग्रेसने दिलेल्या नकारामुळे काही प्रश्न निर्माण झाले आहेत.राम मंदिर उद्घाटन सोहळ्यात उपस्थित राहण्यास काँग्रेसने दिलेल्या नकारामुळे काही प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्यात आजच्या निवडणुकीच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या १९९६ नंतर बदललेल्या वैचारिक भूमिकेचाही समावेश आहे. मोदी, भाजप, संघावर टीका करत असतानाच हिंदू बहुसंख्यकांच्या उत्सवात सामील होणे चांगले नाही का?संसदेतील संख्याबळ ४१४ वरून ५२ वर येण्याच्या प्रवासात (२०१४ ला ४४) मागील चार दशकात काँग्रेस पक्षाच्या मानगुटीवर एक भूत बसलेले होते. ते उतरवण्याची संधी राम मंदिराच्या निर्माणाने काँग्रेसला दिली होती.काँग्रेस नेतृत्वाने ती दवडली. आजच्या काळात 'धर्मनिरपेक्षते'ची व्याख्या कशी करायची, याबद्दल काँग्रेसचा वैचारिक गोंधळ, हे ते भूत आहे. रामलल्लाच्या प्रतिष्ठापना सोहळ्यास उपस्थित राहण्यास नकार दिल्यानंतर साहजिकच काही प्रश्न उभे राहतात.एक म्हणजे, १९९६ नंतर त्यांची बदललेली विचारधारा आजच्या निवडणुकीच्या राजकारणाशी सुसंगत आहे का? राम मंदिराबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत करणे आणि तरीही त्याच्या उद्घाटन सोहळ्यापासून दूर राहणे,या दोन गोष्टींची सांगड ते कशी घालणार आहेत? जो सोहळा लाखो हिंदूंकडून साजरा केला जाईल, यातील अनेक जण काँग्रेसचे मतदार असतील. तुम्ही तुमच्या हिंदू, मुस्लिम आणि सेक्युलर मतदारांना काय सांगणार आहात? तिन्ही मतदार नाराज सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि मुस्लिम तुष्टीकरणामध्ये हेलकावे खाणारी गोंधळलेली तुमची अवस्था आहे, असे हिंदू समजतील. तुम्ही मशीद (बाबरी) वाचवू शकला नाहीत, मंदिर निर्माणाचे स्वागत केले आणि आता उद्घाटनाला अनुपस्थित राहून त्यांची मर्जी जिंकण्याचा प्रयत्न करत आहात, हे मुस्लिम जाणतात.जेव्हा तुम्ही मंदिर/मशीद निर्णयासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत केले, त्याच दिवशी तुम्ही सेक्युलर लोकांच्या दृष्टीने अपयशी ठरलात. म्हणजे तिन्ही प्रकारचे मतदार तुम्हाला दांभिक समजतात. ही परिस्थिती हाताळण्यासाठी काँग्रेसकडे अनेक दशके होती.पक्षाच्या अंतर्गत मतप्रवाहाने (जर असतीलच तर!) सर्व गोष्टींचा विचका केला. इतकी दशके एखाद्या भक्ष्याने शिकाऱ्यापासून वाचण्यासाठी स्वतःच डोळे मिटून बसावे, तशी काँग्रेस बसली होती. डोळे बंद करून शिकार होण्याची वाट बघणारे भक्ष्य? हे थोडे अतिशयोक्त वाटत असले, तरी काँग्रेससाठी ते तंतोतंत लागू पडते. कारण, २०१४ च्या पराभवानंतरही पक्ष अतिशय आत्मसंतुष्ट आहे. आपला वैचारिक गुंता सोडवला नाही, तर आपल्या अस्तित्वाला धोका आहे, हे त्यांना समजत नाही.

मोदी-शहा यांच्या भाजपने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा संस्कृती (धर्म), ओळख (राष्ट्रवाद) आणि सुरक्षा या तीन मुद्द्यांच्या भोवती परिभाषित केली आहे हे माहीत असले पाहिजे. या तिन्ही बाबतीत काँग्रेस पराभूत झाली आहे.आपल्याच सरकारच्या निर्णयाबद्दल मौन या तिन्ही मुद्द्यांवर काँग्रेसची कामगिरी निव्वळ शून्य आहे असे नाही. पण, ते याबद्दल बोलू इच्छित नाहीत. काँग्रेसच्या सत्ताकाळातच राम मंदिराचे दरवाजे उघडले गेले आणि तिथे प्रार्थना सुरू झाली. त्यामुळे शिलान्यास शक्य झाला.राजीव गांधी यांनी १९८९ मध्ये अयोध्येतून रामराज्य आणण्याचे आश्वासन देऊन मोहीम सुरू केली. शाहबानो प्रकरणातील निकाल बदलण्यासाठी कायदा करणे किंवा सलमान रश्दी यांच्या 'द सॅटनिक व्हर्से स' या पुस्तकावर बंदी घालणे,याकडे हिंदू समुदाय मुस्लिम तुष्टीकरण म्हणून बघत होता. याचे परिमार्जन करण्यासाठी राम मंदिर उघडण्याच्या निर्णयाकडे तुम्ही बघत असाल, तर मला एवढेच सांगायचे आहे की हा वैचारिक विरोधाभास आहे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी या दोघांनाही या मुद्द्याबाबत स्पष्टता होती.असे म्हणतात की नेहरू अज्ञेयवादी होते. त्यांच्या काळात ते धार्मिक राजकारणापासून अलिप्त राहू शकत होते आणि पक्षातील हिंदू राष्ट्रवादी नेत्यांनाही पद्धतशीरपणे दूर ठेवू शकत होते. याउलट इंदिरा गांधी आपले हिंदुत्व मिरवत होत्या. (त्या गळ्यात रुद्राक्ष माळा घालत असत.) त्यांनी हिंदूंना कधीही जनसंघाकडे सोपवले नाही. म्हणूनच त्यांनी जनसंघावर 'हिंदू पक्ष' म्हणून हल्ला केला नाही. इंदिरा गांधी त्या पक्षाला 'बनिया पार्टी' म्हणत, आणि सावरकरांचा 'वीर' म्हणून सन्मान करत. तसेच, त्यांच्या मुस्लिम मतपेढीला आव्हान देईल, असे कुणीच नाही हे त्यांना माहीत होते. हा संभ्रम त्यांच्यानंतर सुरू झाला.मोदी भारताची जागतिक प्रतिमा उंचावत आहेत, असा समज त्यांच्या पथ्यावर पडत आहे. खरेतर नेहरू, इंदिरा किंवा राजीव यांच्या काळात काँग्रेसनेही या बाबतीत वाईट कामगिरी केली नव्हती. त्याबद्दल ते का बोलत नाहीत हे आश्चर्यजनक आहे. राष्ट्रीय सुरक्षिततेच्या बाबतीत मोदी यांची कामगिरी चांगली आहे. मोदी यांच्या उदयानंतर पठाणकोट वगळता जम्मू आणि काश्मीरच्या बाहेर एकही मोठा दहशतवादी हल्ला झालेला नाही.भाजपशासित राज्यांत विशेषतः उत्तर प्रदेशात कायदा व सुव्यवस्थेत सुधारणा आहे. याचे बक्षीसही मतदारांनी त्यांना दिले आहे. अंतर्गत सुरक्षा राखण्यासाठी आपल्या सरकारांनी किती कठोरपणे काम केले, हे सांगायला काँग्रेस मात्र तयार नाही.यात १९९१-९३ ला शिख आणि काश्मिरी फुटीरतावाद पी. व्ही. नरसिंह राव यांनी कसा मोडीत काढला याचाही समावेश असेल. राजीव गांधी यांना आसाम, मिझोराममध्ये मिळालेल्या तसेच पंजाबमध्ये संत हरचंद सिंग लोंगोवाल यांच्याशी करार करून मिळालेल्या यशाबद्दलही काँग्रेस बोलत नाही. आता तुम्ही म्हणाल हे हरचंद सिंग कोण होते? तर तुम्ही काँग्रेसचे मतदार किंवा हितचिंतक असाल तर गुगल करून बघा. कारण, पक्ष तुम्हाला ते सांगणार नाही.काँग्रेसची विसंगती काँग्रेस अनेक विसंगतींनी घेरलेली आहे. त्यांच्या भूतकाळातून त्यांना नेमके कुणाला समोर आणायचे आहे आणि कुणाला रद्दबातल करायचे आहे? काश्मीर आणि ३७० कलमावर त्यांची भूमिका काय आहे? ते हा बदल स्वीकारणार आहेत की सत्ता आल्यानंतर हा निर्णय उलटा फिरवणार आहेत? हे सर्व महत्त्वाचे आहेच; पण श्रीराम मंदिराच्या बाबतीत त्यांची भूमिका काय आहे, हे सर्वात महत्त्वाचे आहे. मोदी, भाजप, संघ यांच्यावर टीका करत असतानाच बहुसंख्याक हिंदू समुदायासोबत उत्सवात सामील होणे चांगले नाही का? हा नक्कीच सर्वोत्तम पर्याय नाही. पण, किमान प्रत्येक लग्नात बोटे मोडणाऱ्या चिडखोर काकासारखे दिसण्यापेक्षा हे कितीतरी पटीने चांगले आहे!

# शौर्याच्या जयस्तंभालाच भिती

कोरेगाव भिमा येथील शौर्य चे प्रतिक असलेला जयस्तंभालाच भिती निर्माण झाली आहे. हि सत्य घटना अनेक लोकांना माहीतीच नाही. १८१८ साली अन्याय, अत्याचार करून विषमतावादी पेशवाई पाचशे शुरविरांनी संपवून टाकली. हा जागतिक पराक्रम कोरेगाव भिमाच्या जयस्तंभामुळे आजही आपल्या समोर आहे. पाचशे शुर योद्ध्यांनी अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून अन्याय अत्याचाराचा बदला घेऊन त्यांचे वर्चस्वच संपवून टाकले. कोरेगाव भिमाची लढाई ही केवळ सत्तेची लढाई नव्हती तर अस्तित्व आणि अस्मितेची होती. ज्या लढाईने शुरविरांचे अस्तित्व दाखवून दिले त्याच अस्तीत्वाची निशाणी अर्थात कोरेगाव भिमाचा जयस्तंभ आज अडचणी मध्ये आहे. दर वर्षी एक जानेवारी ला लाखोंच्या संख्येने कोरेगाव भिमाला जाणाऱ्या लोकांना आजही जर कोरेगाव भिमाच्या जयस्तंभाबद्दल, तेथील अडचणी बद्दल माहिती नसेल तर हि खुप मोठी शोकांतिका आहे. आपण एक जानेवारी कोरेगाव भिमा, विजयादशमी नागपूर, चौदा जानेवारी औरंगाबाद, सहा डिसेंबर मुबंई ला लाखोंच्या संख्येने जमतो आणि दुसऱ्या दिवशी शांत होतो. भिमजयंती प्रत्येक गावात प्रत्येक बौद्ध घरात साजरी केली जाते, हजारो लाखो रुपये खर्च केले जातात, नाचगाणे, मनोरंजन करून दिवस जगुन स्वतः ला आंबेडकरवादी स्वतः च म्हणवून घेण्यात धन्यता मानतो. परंतु एकत्र यायचे कशासाठी? ह्या प्रश्नाचे उत्तर कोणीच शोधले नाही. केवळ इतर लोक जत्रा यात्रा यामध्ये एकत्र जमतात तसेच आपण वरील ठिकाणी जमुन जत्रा यात्रा साजरी करत असु तर आपण अधोगतीकडे वाटचाल करत आहोत हे लक्षात घ्या. आंबेडकरवादी चळवळ करताना आणि विचार सांगताना जत्रा यात्रा भरवून भागणार नाही तर लाखोंच्या संख्येने स्वयस्फुर्ती ने एकत्र आलेल्या लोकांचे सामाजिक प्रबोधन होणे गरजचे आहे, सामाजिक व वैचारिक कार्याची समिक्षा करून येणाऱ्या काळात कोणकोणत्या गोष्टींवर काम करायचे याचे नियोजन करणे आवश्यक आहे. एक जानेवारी आली म्हणून चाललो कोरेगाव ला, चौदा जानेवारी आली म्हणून चाललो औरंगाबाद ला, विजया दशमी आहे म्हणून चाललो नागपूरला, सहा डिसेंबर आहे म्हणून चाललो मुंबई ला केवळ आल्या केल्याने परिवर्तन होणार नाही तर जायचे कशाला हा प्रश्न आणि त्या प्रश्नाचे उत्तर मिळाले तरच वरिल ठिकाणी जाण्यात आनंद आहे. आपण आजही आपल्या ऐतिहासिक स्थळाबद्दल जागृत व गंभीर नाही आहोत. याचे उदाहरण म्हणजे नागपूर ला दरवर्षी जाऊनही घरातील अंधविश्वास कमी होत नाही, औरंगाबाद ला दरवर्षी जाऊन ही नामांतर लढ्यातुन एकीची शिकवण घेत नाहीत, भिमाकोरेगाव ला जाऊन ही शौर्य व अन्यायाची जाणीव होत नाही, दरवर्षी घराघरात भिमजंयती साजरी होऊनही भिमाचे विचार डोक्यात जात नाही हे कटूसत्य कोणीही नाकारू शकत नाही. भिमाकोरेगाव जयस्तंभ आणि जयस्तंभाच्या देखभालीसाठी जी जागा दिली होती त्या जागेवर अतिक्रमण केले गेले आहे. जयस्तंभची जागाच आज धोक्यात आली आहे. जर




जयस्तंभ सुरक्षित नसेल आणि त्याची माहिती आपल्याला नसेल तर आपण कोरेगाव ला जाऊन साध्य तरी काय करतो. एक जानेवारी ला कोरेगाव जयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते याबाबत किती लोक जागृत आहेत. भिमा कोरेगाव जयस्तंभाला अतिक्रमाणाच्या विखळ्यातुन काढण्यासाठी न्यायालयीन लढा लढणे आवश्यक आहे. मागील अनेक वर्षांपासून भिमाकोरेगाव जयस्तंभाची न्यायालयीन लढाई दादाभाऊ अभंग हे एकटेच लढत आहेत. न्यायालयीन बाजु लढायची तर पैसा वेळ खर्च करावा लागतो. एवढे करूनही निकाल काय लागेल याची शाश्वती नसते. भिमा कोरेगाव जयस्तंभ हा समाज्याच्या अस्मितेचे आणि अस्तित्वाचे प्रतिक आहे, दरवर्षी लाखों लोक जयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी जातात. परंतु याच स्तंभाच्या संवर्धनासाठी कीती लोक समोर येतात हा प्रश्नच आहे. सामाजिक लढा एकट्याने लढायला खुप अडचणी येतात. सामाजिक लढा लढायला समाजाची मदत झाली तर लढायला ताकद आणि सकारात्मक उर्जा मिळते. परंतु कित्येक वर्षांपासून दादाभाऊ अभंग हे एकहाती एकटेच हि बाजु सांभाळून न्यायालयीन लढा तिव्र करत आहेत. अनेक वेळा वेगवेगळ्या माध्यमातून समाजाच्या मदतीसाठी त्यांनी आव्हाहन ही केले आहे. परंतु आपल्याला त्या बाबींचे गांभीर्य नसल्याने जास्त कोणी मनावर घेत नाही. परंतु आता वेळ आली आहे कोरेगाव भिमाच्या संरक्षणासाठी एकत्र येऊन सामाजिक लढा उभा करण्याची. दादाभाऊ अभंग यांना सर्वो तोपरी मदत करून हा न्यायालयीन लढा जिंकण्याची. एकटे दादाभाऊ अभंग हे हा लढा मोठ्या नेटाने लढत आहेत परंतु आपल्याला त्यांच्या सोबत उभे राहून सामाजिक, आर्थिक ताकद लावणे गरजेचे आहे. कारण कोरेगाव भिमाचा जयस्तंभा विषयी खुप मोठे काम करणे खुपच गरजेचे आहे. न्यायालयाचा निकाल आला तर त्याचे संवर्धन व सुशोभीकरण करावे लागेल, निकाल नाही आला तर पुन्हा आव्हान करून वरच्या न्यायालयात जावे लागेल. कोर्ट कचेरीचा खर्च, कोरेगाव भिमा विषयी जनजागृती करून जन समर्थन मिळवण्यासाठी लागणारा खर्च खुप आहे. कोणताही एकटा व्यक्ती हा खर्च करु शकत नाही. आणि एकट्या व्यक्तीनेच हे सर्व का करावे? म्हणून गावागावात प्रबोधन होऊन पैसा वेळ व बुद्धी देऊन आपल्या जयस्तंभाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक गावात एक टीम बनवून कोरेगाव भिमाच्या स्तंभाच्या समस्येचे गांभीर्य लोकांना माहिती करून देऊन सर्वांनी हातात हात घेऊन काम करणे आज गरजेचे आहे. फक्त गप्पा मारून आणि सोशलमिडीयावर राहून आपल्याला लढा जिंकता येणार नाही त्यासाठी रस्त्यावर उतरावेच लागेल. रस्त्यावर उतरायचे तर पैसा वेळ आणि बुद्धी सर्व काही मजबूत पाहिजे म्हणून सर्वांना नाचगाणे आणि मनोरंजन यावरचा खर्च टाळून कोरेगाव भिमाच्या जयस्तंभासाठी देणे आवश्यक आहे. जयस्तंभच नाही तर लेण्याचे दैविकरण करणे सुरू आहे. अनेक जुन्या मंदिरात बुद्ध मुर्त्या आढळून आल्या आहेत या ही वास्तू आपल्याला जर आपल्या ताब्यात घ्यायचे असेल तर आपल्याला सर्व शक्तीने उभे राहणे आवश्यक आहे. कोरेगाव भिमाच्या जयस्तंभाला वंदन करण्यासाठी दरवर्षी लाखों लोक जातात, लेण्यावर दररोज हजारो लोक जातात तरीही जयस्तंभ आणि लेण्यावर काही लोक अतिक्रमण करू पाहत आहेत याचे कारण आहे लेण्या, जयस्तंभ यांच्या विरोधात जो जाईल, लेण्याचे दैविकरण जो करेल त्याच्या मागे एक आर्थिक शक्ती, एक मानवी ताकद उभी असते. आमच्या च पुर्वजांच्या शौर्याचा जयस्तंभ, आमच्या च बुद्धाच्या लेण्या यावर अतिक्रमण केले जाते तरीही आम्हाला त्याचे काहीच वाटत नाही कारण एक आम्ही कधी आमचे ऐतिहासिक स्थळांचे महत्व कधी समजून घेतले नाही, त्याबद्दल गंभीर कधी झालो नाही. आपली बाजु सत्य असुनही कोणी बोलायची हिंमत करत करू शकत नाही कारण त्याच्या मागे आवश्यक असणारी आर्थिक व सामाजिक शक्ती नसते. म्हणून आम्ही जेथेही लाखोंच्या संख्येने जातो ते फक्त एक दिवस डोक्यात त्या जागे बद्दल, स्थळाबद्दल उर्जा असते. बाकी तेथून घरी आलो की सर्व काही विसरून जातो. फक्त गर्दी करून आणि जत्रा यात्रेचे स्वरूप बनवून प्रश्न सुटणार नाही, न्याय मिळणार नाही. अनेक जन बुद्ध मुर्तीलाच देव म्हणून पुजले जाते याचे व्हिडीओ सोशलमिडीयावर शेअर करतात. पण ते बुद्ध मुर्ती आपल्या ताब्यात घेण्यासाठी काय करावे यासाठी किती लोक प्रयत्न करतात? लेण्यांवर दैविकरण केले जात आहे हे थांबण्यासाठी कोणाकडे काय नियोजन आहे? असे अनेक प्रश्न आहेत यावर एकच उत्तर आहे ते म्हणजे सर्वांनी एकत्र येऊन एकमताने, पैसा, वेळ व बुद्धी खर्च केली तरच आपण आपले ऐतिहासिक वारसा स्थळे सुरक्षित ठेऊ शकु. नाहीतर भविष्यात आपले वारसा स्थळे भावी पिढी पाहू शकणार नाही. कोरेगाव भिमा च्या जयस्तंभासाठी आपण सर्वांनी दादाभाऊ अभंग यांच्या लढ्याला साथ सहयोग करून त्यांना लढा लढण्यासाठी बळ दिले आणि कोरेगाव भिमाच्या प्रश्नाविषयी जनजागृती केली तर कोरेगाव भिमा च्या लढ्यासह आपण इतरही लढे यशस्वी लढू शकू याची प्रेरणाही मिळेल. बौद्धांचे ऐतिहासिक वारसा स्थळे संकटात असताना आम्ही केवळ एकच दिवस गोंधळ घालून, नाचगाणे आणि मनोरंजन यावर खर्च करून काहीच साध्य होणार नाही. नाचगाणे व मनोरंजन बंद करून, समाजाचे प्रबोधन करून न्याय हक्क व वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करण्याची उर्जा प्रत्येकात निर्माण झाली पाहिजे. म्हणून प्रत्येकाने होईल त्या प्रमाणात मदत करून कोरेगाव भिमाचा जयस्तंभ न्याय व संवर्धनासाठी प्रयत्न करावे.

जयस्तंभ न्यायालयीन लढा लढणारे दादाभाऊ अभंग यांचा संपर्क क्रमांक: ९७०२८४५०००

**********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा ९१३०९७९३००

# नामांतर दिन आंदोलनाची प्रेरणा

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर दिवस एक आनंदोत्सव म्हणून साजरा केला जातो. त्यामागे तसे कारणही आहे. आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टीने मागास असलेल्या मराठवाडा प्रदेशात शिक्षणाचे रोपटे लाऊन जागतिक पातळीवरचे अभ्यासक, इतिहासकार, राजकीय नेते, साहीत्यीक, अधिकारी घडण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या शिक्षण संस्थेने केले. जेथे शिक्षणाचा गंधही नव्हता तेथे शिक्षणरुपी रोपट्याचा बगीचा तयार करून त्याचा फायदा अगदी गोरगरीब, व शैक्षणिक दृष्टीने मागास लोकांना होऊन त्यांचा शैक्षणिक विकासा सोबतच सामाजिक व आर्थिक विकास करण्यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य खुप महत्त्वाचे आहे. औरंगाबाद या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः हजर राहुन शैक्षणिक पायाभरणी केली हि बाब फक्त मराठवाड्या साठी नाही तर संपुर्ण देशासाठी अभिमानास्पद आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक कार्य व विचार जागतिक पातळीवरचे असुन भारताचा सन्मान वाढणारे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रगल्भ विद्वतेतुन निर्माण झालेल्या संविधानाने हजारो वर्षांपासून ची विषमतावादी व एकहाती सत्ता बदलून तळागाळातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार व संधी बहाल केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे बघताना जातीचा चष्मा उतरून ज्ञान, कार्य व विचार यांच्या कडे डोळस बघितले तर आधुनिक भारताचे निर्माते खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत असे दिसून येते. देशातील प्रत्येक व्यक्तीला स्वतः ची ओळख निर्माण करून देऊन स्वाभिमान बहाल करणारे आणि मुक्त पणे जिवन जगण्याचा अधिकार देऊन त्याचे संरक्षण करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर महानच आहेत. अशा महान व विद्वान महापुरुषांच्या कर्मभुमी मध्ये कोणतेही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक वा राजनैतिक काम होते तेव्हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विसरून चालणार नाही. म्हणून ज्या मराठवाड्यात शिक्षणाचा गंधही नव्हता तेथे शिक्षणाचा प्रवाह आणून पुढे त्याच शहरात विद्यापीठ स्थापन व्हावे आणि त्या विद्यापिठाला महामानवाचे नाव नसावे ही गोष्ट वैचारिक व नैतिक पातळीवर पटणारी नव्हती. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला व विचारांना जाणणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापिठाला मिळावे म्हणून आंदोलन सुरू केले. ज्या महामानवामुळे देशाची ओळख जगात निर्माण झाली, ज्या महामानवामुळे माणसाला माणूस पण आले अशा महामानवाचे नाव विद्यापिठाला देण्यासाठी संघर्ष करावा लागतो. यापेक्षा जास्त दु:खाची कोणती गोष्टी असेल. विषमता, जातीवाद, भेदभाव डोक्यात असलेल्या सडक्या लोकांच्या मेंदूमुळे नामांतर लढ्याला वेगळे वळण लागले. गोरगरीब आंबेडकरवादी समाजावर अन्याय, अत्याचार, बहिष्कार, टाकून आंदोलनाला हिंसक वळण लावून अनेक घरांना आग लाऊन घराची राख केली. ज्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे हक्क अधिकार शिक्षण नोकरी मिळवणाऱ्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंद करून डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीच्या लोकांवर हल्या करणे हे वैचारीक व नैतिक पातळी कीती खालावलेली असेल याचे




उदाहरण आहे. अनेक संकटाचा सामना करून, जिवाची पर्वा न करता, सर्व सामान्य माणसांनी उभा केलेला लढा उग्र रुप धारक करत होता. जातीवादी पिलावळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला विरोधच करत नव्हते तर त्यांच्या अनुयायांचे दैनंदिन जिवन विस्कळीत कसे होईल याचे नियोजन करत होते. संकटे अनेक असली तरीही लक्ष्य मात्र एकच होते. ते म्हणजे विद्यापिठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे. यामध्ये तत्कालीन आंबेडकरवादी व समतावादी नेतेही पद प्रतिष्ठा व मानपानाचा विचार न करता एक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी म्हणून सहभागी झाले व आंदोलनाला बळकटी देण्याचे काम एकीकरणातुन झाले. विद्यापिठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाम मिळण्यासाठी औरंगाबाद मध्ये विद्यार्थीही रस्त्यावर येऊन जिवाची पर्वा न करता लढत राहीले. नागपूर येथे झालेल्या पहिल्या गोळीबारात रतन लक्ष्मण मेंढे, किशोर बाळकृष्ण भाकळे, अब्दुल सत्तार बशीर, शब्बीर हुसेन फझल हुसेन हे शहीद झाले, तर गोळीबारात जखमी झालेल्या अविनाश अर्जून डोंगरे या ११ वर्षांच्या बालकाचाही उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तर दुसऱ्या गोळीबारात दिलीप सूर्यभान रामटेके, ज्ञानेश्वर बुधाजी साखरे, रोशन बोरकर व डोमाजी भिकाजी कुत्तरमारे, रतन मंदेडे हे ५ भीमसैनिक शहीद झाले. तर मराठवाड्यामध्ये पोचीराम कांबळे, सुहाशीनी बनसोड, प्रतिभा तायडे, जनार्धन मवाडे, गौतम वाघमारे, नारायण गायकवाड, रोशन बोरकर, पोलीस अधिकारी गोविंद भुरेवार यांना जिव गमवावा लागला. गौतम वाघमारे, सुहासिनी बनसोडे, प्रतिभा तायडे यांनी स्वतः लाच संपवून नावा साठी शहीद झाले. राजकीय नेत्यांसोबतच सामाजिक कार्यकर्त्यांचे योगदानही विसरता येणार नाही. निच व जातीवादी मानसिकतेच्या लोकांनी घरे जाळलेच नाहीत तर ती लुटून आर्थिक हानी केली, महिलांवर बलात्कार करून स्वतः ला कीती नितीभ्रष्ट आहेत हे सिद्ध करून दिले. गर्भवती, व लहानमुले असलेल्या महिला व बालकांना सुद्धां यामध्ये आपले जिवांचे दान द्यावे लागले. सोळा वर्षे चाललेल्या संघर्षाची घटना डोळ्यासमोर उभी जरी केली तरीही अंगावर काटा येतो. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी खचले नाही, झुकले नाही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापिठाला मिळेपर्यंत शांत न बसणारा समाज विद्यापिठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देऊनच शांत झाला. नामांतर लढ्याचे श्रेय कोणत्याही एका व्यक्तीचे नसले तरीही कोणत्याही एका व्यक्तीला विसरून नामांतर लढा सांगता येणार नाही. नामांतर लढ्यात शहिद झालेले, लढा सतत मजबूत करणारे, राजकीय नेते सामाजिक कार्यकर्ते, महिला, तरुण, बालक या सर्वांचेच महत्त्वाचे योगदान या लढ्यातुन कमी करता येणार नाही. विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळाल्या पासून दरवर्षी १४ जानेवारी ला नामविस्तार दिन विद्यापीठ गेटसमोर शहिदांना आदरांजली वाहून केला जातो. तरुणांचा जिव गेला परंतु लढा जिंकला याचे समाधान लोकांच्या चेहऱ्यावर दिसते. दरवर्षी लाखोंच्या संख्येने विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यासाठी वैचारिक अनुयायी येत असतात. नामविस्तार दिन साजरा करणे म्हणजे वैयक्तिक जाहिरात करणे मुळीच नसुन या दिवशी आपल्याला आंदोलनाची प्रेरणा मिळते. आंदोलन कसे असावे आणि ते कसे लढावे याचे जागतिक किर्तीचे उदाहरण म्हणजे १४ जानेवारी होय. म्हणून विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करताना वैयक्तिक जाहिरात होणार नाही, आपली बेकी दिसणार नाही, आणि सर्वसामान्य मानसांना आंदोलन, लढा यामधून आपण सर्व काही प्राप्त करू शकतो. याची जाणीव निर्माण करून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जावा. वर उल्लेख केलेल्या शहिदापेक्षाही जास्त तरुण तरुणी शहीद झाले, दंगली मध्ये मारल्या गेले. त्या सर्वाचे जिवाचे दान केवळ विद्यापिठाला नाव मिळावे यापुरताच विचार न करता जेव्हा केव्हा हक्क अधिकार स्वाभिमान आणि संविधानाचा प्रश्न उपस्थित होईल तेव्हा तेव्हा आम्ही याच ताकतीने पुन्हा आंदोलन उभे करून न्याय हक्क मिळवून घेऊ हि शिकवण प्रत्येकाच्या मनात रुजवून पुन्हा आंदोलनासाठी सज्ज राहण्याचा संदेश या दिनी सर्वांपर्यंत जाने आवश्यक आहे. नामविस्तार दिन साजरा करताना दिनाचे मुळ महत्त्व बाजूला सारून राजकीय जाहिरात न होता, चळवळ, आंदोलन याची प्रेरणा मनामनात रूजवावी हीच अपेक्षा. नामांतर लढ्यात शहिद झालेल्या सर्व ज्ञात अज्ञात शहिदांना, महिला, तरुण, कार्यकर्ते, ज्यांनी घराची राख, बलात्कार, मृत्यू, गावबंदी, बहिष्कार, आर्थिक हानी, लहान मुलांचा मृत्यू सहन करून लढा बळकट केला त्या सर्वांना मानाचे वंदन. नामविस्तार दिनाच्या सर्वांना मंगलमय सदिच्छा..

**************

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी साखर कारखान्यांनी यंत्रणा वाढवून ऊसाचे वेळेवर गाळप करण्याच्या केल्या सुचना



लातूर : दि. १४ जानेवारी २०२४ सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना, विलास सहकारी साखर कारखाना व रेणा सहकारी साखर कारखाना यांनी गळीत हंगामातील उर्वरीत ऊसाचे लवकर लवकर गाळप करण्यासाठी अधिकची यंत्रणा वाढवून ऊसाचे गाळप वेळेवर करण्याच्या सुचना दिल्या. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना परीवारातील यावर्षीचा सर्वच कारखान्याचा गळीत हंगाम अधिक क्षमतेनी चालविण्यासाठी चांगली तयारी केली. यासाठी लागणारी आवश्यक तोडणी – वाहतूक यंत्रणा सज्ज केली. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी होते. पावसाने मध्येच मोठा खंड दिला होता. पाऊसाचे प्रमाण कमी असल्याने ऊसाची वाढ झाली नाही. एकरी कमी उत्पादकतेचा अंदाज होता. मात्र नोव्हेबर – डिंसेबर २०२३ नंतर परतीचा पाऊस पडला. या पावसामुळे ऊसाला फायदा झाला ऊसाचे एकरी उत्पादनही वाढल्याचे दिसून येत आहे. पण याकाळातील अवकाळी पावसामुळे काही काळ गळीत हंगामास व्यत्यय आला. सदया हंगाम गतीने सुरू आहे मात्र कारखाना क्षमता अधिक असून यासाठी अधिकची यंत्रणा लागत आहे. ही परिस्थिती पाहता या हंगामासाठी उर्वरीत राहीलेल्या ऊसाचे वेळेवर गाळप करण्यासाठी अधिकची यंत्रणा वाढवून ऊसाचे लवकरात लवकर गाळप करावे अशा सुचना कारखाना प्रशासनाला दिल्या आहेत.सदया तापमान वाढत असून पाण्याचे दुर्भीष्य जाणवत आहे. खरीप आणि रब्बीतील कोणत्याच पिकाला भाव नाही. यामुळे सभासद व ऊसउत्पादक शेतकरी आपल्या ऊसाची लवकर ऊसतोडणीसाठी प्रयत्न करीत आहेत. सुरू असलेला गळीत हंगाम वाढू नये सर्व उर्वरीत उसाचे गाळप वेळेवर व्हावे या अनुषंगाने सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कारखान्याकडील आहे त्या यंत्रणेची कार्यक्षमता दुप्पट वाढविण्याच्या सुचना कारखाना प्रशासनाला दिल्या आहेत. तसेच अन्य कारखान्याकडील यंत्रणा घेऊन येथील यंत्रणा वाढवली आहे. या वाढलेल्या यंत्रणेमुळे ऊसाचे वेळेवर गाळप होईल.लातूर ग्रामिणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी गळीत हंगामाची वाटचाल आणि ऊसतोडणी कार्यक्रमाची घेतला आढावा उर्वरीत ऊसाचे वेळेवर गाळप करण्यासाठी यंत्रणा वाढविण्याच्या केल्या सुचना लातूर ग्रामिणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी लातूर तालुका, रेणापूर तालुका आणि औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ऊसाचे वेळेवर गाळप व्हावे या अनुषंगाने विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, विलास सहकारी साखर कारखाना, रेणा सहकारी साखर कारखानाच्या ऊसतोडणी व ऊसवाहतूक यंत्रणेची आणि सुरू असलेल्या गळीत हंगामाचा आढावा घेतला.जानेवारी महीना सुरू असून पाण्याचे दुर्भीष्य, वाढते ऊन यामुळे सभासद आणि ऊसउत्पादक आपला ऊस लवकर जाण्यासाठी कारखान्याकडे मागणी करीत आहेत. या अनुषंगाने लातूर ग्रामिणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सुरू असलेल्या गळीत हंगाम वाटचालीची व सर्व यंत्रणेची माहीती घेतली. कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद आणि ऊसउत्पादकाच्या उर्वरीत ऊसाचे गाळप लवकरात लवकर व्हावे या अनुषंगाने त्यांनी सर्वच कारखान्याकडे या भागात अधिकची त्रणा वाढविण्याच्या सुचना कारखाना प्रशासनाला केल्या आहेत. या भागात अधिक यंत्रणा वाढवून ऊसाचे गाळप लवकर करण्याच्या सुचना आमदार देशमुख यांनी केल्या आहेत.

# व्ही एस पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके व डॉ. हरिश यांचा सेंट्रल रेल्वे युनियन, सर्जरी विभागाच्या वतीने जंगी सत्कार





लातूर :- पुण्याच्या ग्लोबल सस्कॉलर्स फाउंडेशन तर्फे २०२४ या वर्षीचा मानाचा राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार व्ही एस पँथर संघटनेचे सं.अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांना मिळाल्याबद्दल तसेच डॉक्टर हरेश यांचा निरोप समारंभ लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सर्जरी विभाग आणि सेंट्रल रेल्वेच्या लातूर विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.. या वेळी सर्जरी विभाग प्रमुख डॉ.मेघराज चावडा , डॉ.हरीश सर,डॉ.प्रमोदलोकरे,डॉ.वरद,डॉ.गौरीगिल्डा,डॉ.नितीनबेर्डे व लातूरच्या सेंट्रल रेल्वे डिपार्टमेंट तर्फे स्टेशन प्रबंधक राहुल गायकवाड , रेल्वे इंजी.संतोष मांदळे ,स्टेशन सुपरवाजर धीरज इंगळे, टी.सी ढगे ,लोको पायलट दयाल , इलेक्ट्रिक इंजी.प्रमोद गाडेकर,मनोज कांबळे ,मोहन पांचाळ,अतुल बंडगर ,रोहित शेळके, तसेच व्ही.एस.पँथर संघटने तर्फे प्रदेशाध्यक्ष,तथा मा.नगरसेवक सचिन मस्के ,अशोक हानवते संपादक दैनिक महावृत्त व जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर,मा.नगरसेवक रघुनाथ बनसोडे,आनंद जाधव ,नितीन सोनवणे,नागेश कांबळे,अजय सूर्यवंशी,आशुतोष जोगदंड व इतर कार्यकर्ते व डॉक्टर्स उपस्थित होते...

# डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या राज्याध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते राज क्षीरसागर यांची निवड



लातूर -- येथील पत्रकार भवन येथे डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना (ए बी एस फोर्स) ची महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातील जिल्हाध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते राज क्षीरसागर यांची अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या राज्य अध्यक्षपदी सर्वांमध्ये निवड करण्यात आली.

यावेळी डॉ अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणाले की समाजाची आर्थिक सामाजिक राजकीय परिस्थिती म्हणावी तशी आणखीन बदललेली नाही त्यात समाजातील काही राजकीय पक्षाच्या दलालामुळे मानव हित लोकशाही पक्षाचे नुकसान झाले आहे त्यात अनेक नेते असून त्या नेत्यांनीही समाजाकडे आजपर्यंत पाहिलेली नाही केवळ त्यांनी स्वतःचे हित जोपासले आहे. आता श्री अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या माध्यमातून समाजाला न्याय देण्यात येणार असून समाजाच्या न्याय हक्कासाठी डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना लढा देणार असल्याचे साठे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

यावेळी व्यासपीठावर ॲड. टी. एन कांबळे, माजी नगरसेवक जी.ए. गायकवाड, संपादक पंडित हनमंते, लहुजी सेनेचे अध्यक्ष अंगद वाघमारे तसेच डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे नांदेड,धाराशिव,अहमदनगर, बीड, परभणी, सोलापूर व इतर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व कार्यकर्ते व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या वारसदाराचे नवीन सामाजिक संघटन अण्णा भाऊ साठे क्रांती सेना(–इड) चे लातूर मधे आ.सचिन साठे यांच्या उपस्थितीत दिमाखदार उद्घाटन:संघटनेच्या प्रदेश अध्यक्ष पदी मा.राज क्षीरसागर यांची निवड या प्रसंगी रवि अर्जुने,सुनील सौदागर ,किशोर शिंदे ,बालाजी कलवले, सुरज लोंढे ,अश्विन कांबळे, आकाश मोठेराव, गायकवाड ज्ञानेश्वर, सचिन्द्र कांबळे ,नूतन हनुमंते, श्याम जाधव, आशुतोष कांबळे, मनोज तंबोरे ,सुरज शिंदे, अजय लोंढे ,तोडकर बबलू ,राजू पवार, अभिनंदन डोळे ,रवी कदम, माने, योगेश उपाडे ,सागर बडगे, आकाश घोलप, अजय सोपटे, घोलप सौदागर , दिग्विजय साठे, विकी जाधव ,दशरथ गोणे ,नागेश जाधव, गायकवाड आनंद ,प्रवीण मगर, मस्के बिबीशन आधी सर समाजबांधव मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित होते.

# ग्रंथपाल बी एल कांबळे यांना मातृ शोक



लातूर:- लातूर येथील जुने जिल्हाधिकारी कार्यालयात शासकीय ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत असलेले बी एल कांबळे यांच्या मातोश्री काशीबाई लक्ष्मण कांबळे यांचे वयाच्या ८८ वर्षी वृद्धापकाळाने त्यांच्या मुलाच्या विकास नगर येथील घरी सोमवार १५ जानेवारी रोजी दुपारी १–००वाजता निधन झाले. त्यांचा अंत्यविधी खाडगाव शमशानभूमी येथे सोमवार १५ जानेवारी रोजी सायंकाळी ६–०० वाजता करण्यात आला.त्यांच्या पश्चात एक मुलगा बी एल कांबळे,सून,दोन नातू, प्रमोद,प्रवीण, एक नात असा परिवार आहे. काशीबाई लक्ष्मण कांबळे हे मूळचे मौजे शिरूर वांजरवाडा ता. निलंगा जिल्हा लातूर येथील रहिवासी असून. अतिशय कष्टाने आपल्या मुलाला सांभाळून शिक्षण दिले. त्यांच्या या दुःखद निधनामुळे कांबळेपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या या दुःखात दैनिक महावृत्त परिवार सहभागी आहे.

## आता १४ विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव आहे.

४) डॉ. बी.आर. आंबेडकर राष्ट्रीय विधी विद्यापीठ – सोनिपत, हरियाना

५)डॉ. बी.आर. आंबेडकर सामाजिकशास्त्र विद्यापीठ, महू, मध्यप्रदेश

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, महाराष्ट्र

७)डॉ. बी.आर. आंबेडकर विद्यापीठ, श्रीकाकुलम

८ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, महाराष्ट्र




९)डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ, गुजरात

१०) डॉ. बी.आर. आंबेडकर राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थान, जालंधर, पंजाब

११) तमिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई

१२) बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठ, लखनौ, उत्तर प्रदेश

१३ डॉ. भीमराव आंबेडकर विद्यापीठ, आग्रा, उत्तर प्रदेश

१४)डॉ. भीमराव आंबेडकर विधी विद्यापीठ, जयपूर, राजस्थान

# शोषणमुक्त समाज निर्माण करण्यासाठी स्वतःच्या संस्कार सोहळ्याचे स्वतःच पुजारी बणा - रामचंद्र सालेकर




चंद्रपूर :– दि.१२ जानेवारी २०२० ला मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे भव्य दिव्य जिजाऊ जन्मोत्सवी वैष्णवी आणि निलेश यांचा शिवविवाह संपन्न झाला होता. या नवदाम्पत्याचे कुटुंबात दीपावलीच्या प्रकाश पर्वावर प्रकाशाच्या झगमगाटात १५ नोव्हेंबर २०२३ ला कन्यारत्नाचे आगमन झाले.त्याचे औचितत्य साधून आज १२ जानेवारी २०२४ ला राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ जन्मोत्सव या मंगलमय दिनी राशी,भविष्य, ग्रह,कुंडली,शुभ अशुभ,होम, हवन,कर्मकांड या भ्रामक कल्पने विरहित प्रबोधनात्मक शिवधर्म पद्धतीने नामकरण सोहळ्याचे बावणे मंगलकार्यालय वरोरा येथे आयोजन करण्यात आले.या सोहळ्यात सालेकर – भगत परिवाराच्या तथा आप्तेष्टांच्या सर्वसंमतीने बाळाचे विद्रोही असे नामकरण करण्यात आले. उपस्थितांना विद्रोही नावाचा अर्थ सांगताना रामचंद्र सालेकर म्हणाले की,अन्याय अत्याचार,अनिष्ट परंपरेच्या विरोधात बंड करून पेटून उठणारा म्हणजे विद्रोही. राष्ट्रमाता राजमाता जिजाऊंनी प्रस्तापितांच्या अन्याय अत्याचार अनिष्ट परंपरेला झुंगारून बाळ शिवाजीमध्ये स्वराज्याचे स्फुरण पेटून स्वराज्य निर्माण केले. अशा विद्रोही माँ जिजाऊंचे सदैव स्मरण राहून आयुष्यात लढण्याची प्रेरणा मिळत राहावी असा रामचंद्र सालेकार उपाध्यक्ष शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद महाराष्ट्र यांनी अर्थ स्पष्ट करून दिला.

याप्रसंगी साहित्यिक तथा शिवव्याख्याते शिवश्री सुधाकर चौखे सर यांचे प्रबोधनत्मक व्याख्यान झाले. नामकरण संस्कार सोहळ्याची संपूर्ण संस्कार विधी स्वतः आजोबा रामचंद्र सालेकर (मराठा सेवा संघ शिव व्याख्याते) यांनी कोणत्याही प्रकारचे होम हवन कर्मकाण्ड विरहित आपल्या निसर्गपूजक मातृसत्ताक शिवसंस्कृती प्रमाणे धान्यादी मानव उपयोगी कृषिसंसाधनाचे व जिजाऊ प्रतिमेचे पूजन जिजाऊ वंदनेने तथा अभंग गाथेच्या वाचनाने नामकरण संस्कार सोहळ्याचा संपूर्ण सोपस्कार पार पाडला कर्मकांडाच अवडंबर न माजवता,भट पुरोहित पूजाऱ्याच्या शोषणाला बळी न पडता शिवधर्म गाथेत सांगितल्याप्रमाणे स्वतः च्या कार्यक्रमाचा संस्कार स्वतःच पुजारी बनून पार पाडावा असे रामचंद्र सालेकार उपाध्यक्ष शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद महाराष्ट्र यांनी आवाहन करून समाजाला एक आदर्श घालून दिला. पाळणा गितांनी व स्वरूची भोजनानी कार्यक्रमांची सांगता करण्यात आली. रामचंद्र सालेकर,वरोरा, मो.९५२७१३९८७६.यांनी शोषणमुक्त समाज निर्माण करण्यासाठी स्वतः च्या संस्कार सोहळ्याचे स्वतःच पुजारी बणा असे बोलून नाही तर स्वतच्या घरातून करून दाखविले म्हणूनच त्यांचे सर्व मान्यवरांच्या वतीने अभिनंदन होत आहे.इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो हे रामचंद्र सालेकर यांनी दाखवून दिले.त्यांचा हा शिवधर्म पद्धतीने नामकरण सोहळा आणि विद्रोही समाजाला लक्षवेधी आणि प्रेरणादायी ठरणार आहे.

सागर तायडे यांसकडून

# पूर्णा–ताडकळस राज्य महामार्गावर रास्ता रोको आंदोलन



पूर्णा : केंद्र सरकारने हिट अँड रन कायदा लागू केल्याच्या निषेधार्थ सोमवार, दि.१५ जानेवारी रोजी पूर्णा शहराजवळील पूर्णा– ताडकळस टी पॉइंट या राज्य महामार्गावर जय संघर्ष वाहन चालक मालक संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी हिट अँड रन कायदा रद्द रद्द करण्याच्या घोषणा देत केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत तीव्र निषेध करण्यात आला. यानंतर तहसीलदार यांच्यामार्फत पंतप्रधान यांना निवेदन पाठवण्यात आले. या रास्ता रोको आंदोलनामुळे वाहतूक ठप्प होवून वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यामुळे प्रवाशांना मात्र अडचणींचा सामना करावा लागला.या निवेदनात हिट अँड रन हा काळा कायदा रद्द करण्यात यावा. ड्रायव्हर सुरक्षिततेसाठी कायदा अमलात आणावा. वाहन चालकांसाठीचे कल्याणकारी आर्थिक महामंडळाची अंमलबजावणी करण्यात यावी. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात योजनेची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी जय संघर्ष चालक–मालक संघटनेचे संस्थापक संजय हळनोर, जिल्हाध्यक्ष सुरेश बायस, महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल पुंडगे, तालुकाध्यक्ष केरबा लोखंडे यांच्यासह शहरासह तालुक्यातील असंख्य चालक–मालक रास्ता रोको आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलन दरम्यान पूर्णा पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षण प्रदीप काकडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कोकण विभागातर्फे दर्पण पुरस्कार सोहळा नवी मुंबई येथे संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक : १३ रोजी नवी मुंबई येथे 'आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर ' यांच्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या निर्देशानुसार कोकण विभागातर्फे कोकण विभागीय कार्याध्यक्ष : राजेंद्र बोडके यांच्या नेतृत्वाखाली व हक्काचा आवाज संपादक : प्रवीण हांडे यांच्या सहकार्याने पत्रकार दिनानिमित्त प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला हार घालून पूजन केले व मान्यवरांना सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले व अनेक पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कोपरखैरणे विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक : अजय भोसले व रबाळे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक : राजेंद्र कोते व महाराष्ट्र गुन्हे तपास वृत्तपत्राचे संपादक सुभाष जाधव, लोकनीती वृत्तपत्राचे संपादक : संतोष वावळ, निर्भिड आमदार वृत्तपत्र संपादक : मनोहर शिवपुजे, स्टार वेब टीव्ही न्यूजचे संपादक:– अनिल कुमार उबाळे, वाशी समाचार वृत्तपत्राचे : संपादक सुनील तावडे महाराष्ट्र क्राईम न्यूज वृत्तपत्रचे संपादक : एकनाथ अडसूळ, जनादेश वृत्तवाहिनीचे संपादक : सुरेश पाटील. बुलंद महाराष्ट्र शासन वृत्तपत्राचे संपादक : सिद्दिकी शेख, हक्काचा आवाज वृत्तपत्राचे मुख्य संपादक : सौ. संध्या प्रवीण हांडे व सहसंपादक : अशोक लांडगे, जनतेचा सावधान महाराष्ट्र वृत्तपत्राचे उपसंपादक:– कुंडलिक कानगुडे, महाराष्ट्र क्राईम न्यूज चे उपसंपादक : वामन चव्हाण, दैनिक पुण्यनगरी चे ज्येष्ठ पत्रकार दीपक देशमुख, दैनिक पुढारीचे पत्रकार विठ्ठल ममताबादे, दैनिक अक्षराचे पत्रकार : जे के पोळ, विश्वभारती कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थापक व समाजसेवक सुभाष गायकवाड, बहुजन समाज पार्टीचे नवी मुंबई प्रभारी प्राध्यापक दत्ता हेगडे, सर्वज्ञ मोटर ट्रेनिंग स्कूलचे संस्थापक मधुकर पाटील समाजसेवक राजेश जैस्वाल,व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे नवी मुंबई अध्यक्ष दशरथ चव्हाण व नवी मुंबईतील संघटनेचे सर्व सदस्य व पत्रकार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना रबाळे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की पत्रकार दिनाच्या औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कोकण विभागाच्या वतीने कार्याध्यक्ष राजेंद्र बोडके व इतर सहकाऱ्यांच्या वतीने हा जो कार्यक्रम आयोजित केलेला आहे ही मराठी पत्रकारिता विविध राज्यांसह दिल्ली पर्यन्त पोहचलेली आहे आणि परदेशातही पोहचावी आणि मराठी माणसाचा मराठी पत्रकारतेचा झेंडा हा नक्की परदेशात पर्यन्त पोहचन याची मला खात्री आहे मी शुभेच्छा व्यक्त करतोय त्यानिमित्ताने जे विविध वृत्तपत्राचे संपादक पत्रकार डिजिटल मीडिया,प्रिंट मीडिया मोठ्या संख्येने उपस्थित आहेत आणि याप्रसंगी आम्हाला जे बोलवण्यात आले आहे त्याबद्दल मी आपला आभार व्यक्त करतो व मराठी पत्रकारिता जिवंत ठेवण्यासाठी मराठीत पत्रकार हा कणखर बाणाने राहिला पाहिजे आणि परदेशातही मराठी पत्रकारिता पोहचेल याची मला १०० टक्के खात्री आहे की मराठी पत्रकारितेचा बाणा हा शेवटपर्यंत टिकला जाईल यानिमित्ताने मी सर्व पत्रकारांना शुभेच्छा देतो.

कोपरखैरणे विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी पत्रकार दीना निमित्त बोलताना सांगितले की पत्रकार दिनाच्या कार्यक्रमाचा अनुषंगाने सर्वात प्रथम जांभेकर सरांनी जे वृत्तपत्र दर्पण सुरू केले तर तो आपल्याला वारसा मिळालेला आहे प्रत्येकाने मिळालेल्या वारसाचा आणि संविधानाने मिळालेल्या हक्काचं तुम्ही हिरहिरीने पालन करताय याहुनी अजून चांगलं पालन करावे आणि समाजातल्या ज्या काही चुकीच्या गोष्टी आहेत ज्या काही वाईट गोष्टी आहेत त्या उघड करून पूर्ण सत्य समाजासमोर आणण्याची आपली तयारी आणखी बळकट करावी जेणेकरून महाराष्ट्र आणि आपलं देश हा पुढे जाईल समाज गुण्यागोविंदाने नांदेन याकरिता आपण आणखी प्रयत्न करावेत आणि सर्वांना एक चांगली पत्रकारिता निदर्शनास आणून द्यावी याकरिता मी तुम्हाला धन्यवाद देतो. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे कोकण विभागीय कार्याध्यक्ष राजेंद्र बोडके यांनी पत्रकारांना मार्गदर्शन करताना सांगितले की आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे पहिलं मराठी वृत्तपत्र चालू केले आणि मराठी पत्रकारांना एक व्यासपीठ तयार करून दिले जनता आणि प्रशासन व राजकीय या दोन्ही घटकांमधला दुवा म्हणजे पत्रकार, पत्रकार हा समाजाचा आरसा असून एक चौथा आधारस्तंभ आहे पत्रकारांना पत्रकारिता करताना अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो संघर्ष करावा लागतो खरी बातमी जनतेसमोर मांडत असताना पत्रकारांना अनेक राजकीय शासकीय व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींमुळे अनेक गोष्टींचा त्रास सहन करावा लागतो तरीही आमचे पत्रकार न डगमगता पत्रकारिता करतात आणि समाजाच्या हितासाठी अनेक गोष्टींचा त्याग करून खरी पत्रकारिता समाजासमोर मांडतात हे सर्व करत



असताना आमच्या पत्रकारांना येणाऱ्या अडचणी त्यांच्यावरती होणारा अन्याय हा कुठेतरी थांबवला पाहिजे, पत्रकाराची कणखरता हत्यार म्हणजे पत्रकारिता त्याची लेखणी या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ हा नेहमीच तळागाळातील पत्रकारिता करणाऱ्या पत्रकाराला व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ही संघटना काम करते कुठल्याही पत्रकारावरती खोटे गुन्हे किंवा शासकीय दबावापोटी काही गोष्टींना बळी पडावे लागतं त्यामुळे या संघटनेच्या माध्यमातून आम्ही अशा पत्रकाराला या संघटनेचे संघटक संजय भोकरे, संघटनेचे अध्यक्ष वसंत मुंडे, व संघटनेचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाने व त्यांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पत्रकारावर होणारे अन्यायाबद्दल पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून कार्य केले जाते व पत्रकारांना न्याय मिळवून देण्याचे काम ही संघटना करत असते या संघटनेच्या माध्यमातून फक्त पत्रकारिताच नव्हे तर समाजाची बांधिलकी म्हणून ही संघटना सामाजिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात काम करत असते मग ते वर्षभरामध्ये पत्रकारांचा गुणगौरव सामाजिक क्षेत्रातील काम करणाऱ्या समाजसेवकांचा गुणगौरव विद्यार्थी गुणगौरव सोहळा हेल्मेट वाटप गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहकार्य करणे अशा अनेक वेगवेगळ्या सामाजिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात या संघटनेच्या माध्यमातून कार्य केले जाते संघटनेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोडके यांनी पुढे बोलताना सांगितले की आपल्या विभागातील कुठल्याही पत्रकारांवरती अन्याय होत असेल तर मी नेहमीच आपल्या सर्व पत्रकारांसाठी तत्पर सेवेत हजर राहील आणि होणाऱ्या अन्यायावरती नक्कीच वाच्या फोडून त्या पत्रकाराला न्याय मिळवून देण्याचे काम करेन याची ग्वाही मी आपल्या सर्वांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने देतो व शासनामार्फत पत्रकारांना मिळणाऱ्या तुटपुंज सुखसुविधा आपणास मिळत असल्यामुळे पत्रकारांना चांगल्या पद्धतीने शासनाच्या सुख सुविधा मिळाव्या सर्व पत्रकारांना स्थानिक लेव्हल वरती घरे मिळण्यात यावी पत्रकारांच्या विम्याबद्दल व पत्रकार संरक्षण व पत्रकारांवरती होणाऱ्या चुकीच्या गुन्ह्याबद्दल मी संघटनेमार्फत आवाज उठवेल व सर्व पत्रकारांच्या समवेत एकमेकांच्या समस्या सोडवण्याचं काम या संघटने मार्फत करेल

# नवी मुंबईत वंचित बहुजन आघाडी चा कार्यकर्ता मेळावा संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :– वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक : प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाला अनुसरून ऐरोली सेक्टर ३ येथील जी वार्ड सभागृहात नवनियुक्त नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलीप (अभय) बंदीचोडे यांच्या नेतृत्वात नवी मुंबईतील आजी–माजी पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी येत्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाची भूमिका ठरविण्यात आली. तसेच यावेळी पक्ष वाढीसाठी माजी पदाधिकाऱ्यांनी आपली आपली मते मांडली. पक्षामध्ये युवकांचा मोठ्या प्रमाणात भरणा असल्याने जिल्हाध्यक्ष बंदीचोडे यांनी युवकांसाठी रोजगार मिळवून देण्यासाठी आगामी काळात 'जॉब फेअर' ठेवण्यात येईल व त्यासाठी नवी मुंबईतील (एमआयडीसी) विभागातील जवळजवळ दीडशे कंपन्या संपर्कात आहेत असे वर्तविले. बंदिचोडे यांची नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदी निवड झाले तेंव्हापासून त्यांचे कार्य हे मग पोलीस स्टेशनचा कोणता मॅटर असो की सुख दुःखाचा प्रसंग असो ते पुर्ण वेळ वंचितचे कार्य करीत आहेत. त्यांचे फिल्ड वर्क वाखाणण्याजोगे आसल्याने कार्यकर्त्यात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे समाधान आनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करून त्यांना पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नवी मुंबईचे रिपब्लिकन सेनेचे युवा प्रमुख सुनील वानखडे यांनी आपल्या समर्थकां सह वंचित बहुजन आघाडीत अधिकृतरित्या जाहीर प्रवेश केला.



तसेच शेकडो युवकांनी वंचित बहुजन आघाडीचे सदस्यत्व घेऊन प्रवेश केला त्या सर्व कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. त्यावेळी कार्यकर्त्यांना संबोधीत करताना म्हणाले की, बाळासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्राचे मुखमंत्रीच काय तर या देशाचे प्रधानमंत्री बनण्याची क्षमता त्यांच्यात आहे म्हणून आपन सर्वानी नवी मुंबईतील बुथ, वार्ड बांधनी फिल्ड वर्क कामकरून नवी मुंबईचे नाव महाराष्ट्रात नौलोकीक मिळवावा आसेही म्हणाले. या याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे ज्येष्ठ नेते आनंद बोधी निकाळजे (गुरुजी), संतोष माने, अशोक शिरसाट, सुनील साबळे, सुनील कांबळे, सुनील गायकवाड, सुनील वानखेडे, दीपक पोहरेकर, राजेश भालेराव यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे शानदार सुत्रसंचालन गौतम शिलवंत यांनी केले. या कार्यक्रमास प्रसिद्ध प्रमुख आनंराज गायकवाड, रवि. पी. ढवळे सर, कल्याणराव हनवते इत्यादी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुंबई महानगरपालिकाने संस्था द्वारे नियुक्त केलेले क्लीन अप मार्शल येत्या फेब्रुवारीपासून रस्त्यावर करणार ऑनलाईन दंड

मुंबई/ शहामत शेख:– कोविड काळात अस्वच्छता करणाऱ्या कडून दंडात्मक रकमेची वसुली करणाऱ्या क्लीनअप मार्शल योजना बंद केल्यानंतर, पुन्हा एकदा स्वच्छता राखण्याच्या दृष्टिकोनातून दंडात्मक कारवाई करण्यासाठी क्लीन अप मार्शल तैनात केले जाणार आहे.आजवर पावती पुस्तकाद्वारे दंड आकारणाऱ्या या संस्थेच्या मार्शलकडून ऑनलाईन तथा डिजीटल दंडाची रक्कम वसूल केली जाणार आहे.





अस्वच्छता करणाऱ्याकडून ऑनलाइन दंडात्मक रक्कम वसूल करण्याचे नियोजन केले जात,असून येत्या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून हे क्लीन अप मार्शल दंड वसूल करताना दिसणार आहे. रस्त्यावर थुंकणे ,उघड्यावर कचरा टाकने किंवा अस्वच्छता करणे,उघड्यावर लघवी करणे आदी गैरवर्तनाबद्दल दंडात्मक कारवाई करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या वतीने क्लीन अप मार्शल ची नेमणूक करण्यात आली होती. परंतु कोविड काळात दंड वसूल करत असताना संस्थाचे खिसे भरले जात असल्याचे आरोप झाल्याचे या संस्थाचा करार संपुष्टात आला ,ही योजना बंद करण्यात आली. परंतु आता मुंबई सुशोभीकरण अंतर्गत पूर्ण स्वच्छता मोहीम मुंबई महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे तसेच वाढत्या हवेतील प्रदूषण बाबत बनवलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी अश्या प्रकारे क्लीन मार्शल ची उणीव भासू लागली आहे.यामुळे या अंतर्गत मुंबईत अस्वच्छता करणाऱ्याना शिस्त लागावी पुन्हा एकदा क्लीन अप मार्शलची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या नियुक्ती करिता संस्थेच्या निविदा मागविण्यात आले होते. ही निविदा प्रक्रिया अंतिम होत यास मंजुरी मिळाली आहे, त्यामुळे येत्या दहा,पंधरा दिवसात संस्था कडून नियुक्त होणाऱ्या प्रत्येक मार्शल ला चरित्र प्रमाणपत्राची पडताळणी केली जात आहे.ही पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच संस्थेच्या वतीने मुंबईत महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग कार्यालयाच्या हद्दीत ३० प्रमाणे २४ विभागीय कार्यालयामध्ये क्लीन अप मार्शल नियुक्ती केले जातील, असे अधिकाऱ्याचे म्हणणे आहे.मुंबई महापालिकेने सन २००६ सुरवातीस क्लीन मार्शल योजना सुरु केली होती.त्यानंतर जुलै २०१६ प्रथम क्लीनअप मार्शल योजना सुरू केली. त्यानंतर कोविड काळात सर्वच पातळीवरून आरोप झाल्याने सन २०२२ मध्ये योजना बंद करण्यात आली होती.

# श्री क्षेत्र अयोध्या येथील प्रभू श्री रामचंद्र प्राणप्रतिष्ठेनिमित्त खासदार सुधाकर शृंगारे यांच्यातर्फे रामदरबाराच्या भव्य-दिव्य कार्यक्रमाचे अहमदपूर येथे आयोजन!







लातूर.– प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार लातूर लोकसभा मतदारसंघात अहमदपूर निजवंते नगर, थोडगा रोड येथे १९ जानेवारीपासून प्रभू रामचंद्राच्या राम दरबाराचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये पंधरा हजार स्क्वेअर फूट मध्ये भव्य–दिव्य अशी कलाकृती साकार होत असून त्यामध्ये दोन लाख तीस हजार पणत्यांचा वापर केला जाणार आहे. यावेळी पाच हजार हायड्रोजनचे फुगे आकाशात सोडले जाणार आहेत. शंभरहून अधिक कलाकार १४ जानेवारीपासून अहोरात्र कार्यरत आहेत. तसेच येत्या २२ तारखेला सकाळी ११ वाजता हेलिकॉप्टरच्या माध्यमातून पुष्पवृष्टीचे आयोजन देखील केलेले आहे. त्यासोबतच भव्य अशा एलईडी स्क्रीनवर अयोध्येतील प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देखील होणार आहे. तसेच अहमदपूर नगरीमध्ये प्रथमच भव्य–दिव्य अशा अर्ध्या तासाच्या आतिषबाजीच्या नयनरम्य अशा कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आलेले आहे. तेव्हा सर्व भाविक भक्त यांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे विनम्र आवाहन खासदार सुधाकर शृंगारे यांनी केलेले आहे.

## मॅगसेस पुरस्कार विजेते तथा जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. संजय गवई यांचा सहृदय सत्कार



लातूर दि. १५ चला जाणूया नदीला अभियानाला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मराठवाडा विभागीय आढावा बैठक मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई येथे आयोजित केली होती. या कार्यक्रमांमध्ये मॅगसेस पुरस्कार विजेते तथा जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. संजय गवई यांची महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल आणि मांजरा नदी जलसंवाद यात्रा यशस्वीरित्या पार पाडली त्याबद्दल त्यांचा मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई येथे सहृदय सत्कार करण्यात आला. तसेच कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी नंदकूमार मुंदडा, अभियानाचे राज्य समिती सदस्य नरेंद्र चुग, अनिकेत भैय्या लोहिया, रमाकांत कुलकर्णी, कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. गुणवंत बिरादार आणि लालासाहेब आगळे यांच्यासह विविध कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे महाराष्ट्रातील गरीब, होतकरू आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे महत्वपूर्ण कार्य करते. या महाविद्यालयाला चला जाणूया नदीला अभियानाच्या संदर्भात भेट देण्याचा योग आला होता. या महाविद्यालयाचे सर्व संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यामध्ये अत्यंत मैत्री भावाचे संबंध असल्याचे मी स्वतः अनुभवले आहे असे सांगून त्यांनी पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE